# सरोजनी बाबर यांच्याविषयी चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण अध्यासन व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या संयुक्त विद्यमाने 'सरोजिनी बाबर : कार्य व संशोधन लेखन' या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र होत आहे. भौतिकशास्त्र सभागृहात मंगळवारी (ता. ७) सकाळी १० वाजता चर्चासत्राचे उद्‌घाटन खासदार श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी प्र- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. कुमुदिनी पवार प्रमुख उपस्थित राहतील. प्रा. डॉ. राजन गवस हे बीजभाषण करणार असून डॉ. अरुण शिंदे, डॉ. अरुण भोसले, डॉ. नीला जोशी, डॉ. सुप्रिया जोशी, संजय पाटील, कृष्णात खोत व विजय जाधव हे अभ्यासक याविषयाची मांडणी करतील.

# सावित्रीबाईंना विविध उपक्रमांनी अभिवादन



न्यू कॉलेज येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कर्तबगार महिलांच्या वेशभूषा व त्यांच्या कार्याची माहिती या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थिनी.



शिवाजी विद्यापीठात सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करताना प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. नमिता खोत, डॉ. भारती पाटील आदी.

कोल्हापूर टाइम्स टीम

मुलींसाठी पहिली शाळा काढणाऱ्या, त्यासाठी समाजाशी संघर्ष करणाऱ्या पहिल्या शिक्षिका, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती कोल्हापुरातील शैक्षणिक व सामाजिक संस्थांच्यावतीने साजरी करण्यात आली. यानिमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

**शिवाजी विद्यापीठ :** प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, आयक्यूएसी संचालक डॉ. आर. के. कामत, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत आदी उपस्थित होते.

**भारती विद्यापीठ इंग्लिश मीडियम स्कूल :** मुख्याध्यापिका उर्मिला शिंदे, विद्यार्थी प्रतिनिधी समृद्धी पाटील, अभिषेक हेगडे यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. माधुरी जगताप यांनी 'मी सावित्रीबाई फुले बोलतेय' हा एकपात्री प्रयोग सादरकेला. सरोजिनी चावरे व रमा प्रभुगावकर यांनी नियोजन केले.

**न्यू कॉलेज :** समाजशास्त्र विभाग, बेटी बचाव अभियान, हिरकणी महिला मंच व अंतर्गत तक्रार समितीच्यावतीने विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांच्या वेशभूषा, गुणदर्शन व मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके करण्यात आली. नारी फाउंडेशनच्या सहकार्याने महिलांमध्ये कॅन्सर जागृतीपर मोहीम राबवण्यात आली. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन व पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. डॉ. कविता गगराणी यांनी संयोजन केले.

**बालसंकुल :** संस्थेच्या मानद कार्यवाह पद्मजा तिवले यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. अधीक्षक पी. के. डवरी, कांचन हेवाळकर, संध्या तळेकर आदी उपस्थित होते.

**नूतन मराठी विद्यालय :** मुख्याध्यापक डी. ए. शिंदे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. शिवाजी जाधव, सई शिंदे व सायली समगार यांनी सावित्रीबाईंचे कार्य मनोगतातून मांडले.

**जवाहरनगर हायस्कूल :** येथे मुख्याध्यापक वाय. एस. पोवार यांच्याहस्ते प्रतिमापूजन झाले. यावेळी भित्तीपत्रकाचे उद्घाटन एस. बी. देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. एस. के. सोनाळकर यांनी सावित्रीबाईंचा जीवनपट व्याख्यानातून उलगडला.

**सरस्वती चुनेकर विद्यामंदिर :** मुख्याध्यापिका पूजा आपटे यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. शोभा शिंदे, शोभा शेलार उपस्थित होत्या. पद्मा सुतार यांनी बालिका दिनाचे महत्त्व सांगितले.

**दत्ताबाळ हायस्कूल :** येथे संस्थेचे उपाध्यक्ष दीपक गोरे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. विविध स्पर्धा घेण्यात आल्या. शिक्षिका पूजा चौगुले यांचे भाषण झाले. संस्थेच्या अध्यक्षा पल्लवी देसाई, सचिव नीलेश देसाई, मुख्याध्यापिका रोहिणी शेवाळे, सचिन डवंग आदी उपस्थित होते.

**महात्मा फुले हायस्कूल, लक्षतीर्थ वसाहत :** शाळेतील शिक्षकांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले. विद्यार्थ्यांनी मनोगतांमधून सावित्रीबाई यांचे जीवनचरित्र आणि शैक्षणिक कामाची माहिती दिली. यावेळी शाळेतील विद्यार्थिनी सावित्रीबाईंच्या वेशात उपस्थित होत्या. कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### अवनिमध्ये मुलींचा सामूहिक वाढदिवस

अवनि संस्थेत निराधार, वंचित मुलींचा सामूहिक वाढदिवस साजरा करण्यात आला. सावित्रीबाई फुले जयंतीच्या निमित्ताने हणबरवाडी येथील संस्थेच्या नवीन इमारतीत हा उपक्रम साजरा करण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या मेघा पानसरे प्रमुख उपस्थित होत्या. डी. वाय. पाटील कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. कलिमनी यांनी विद्यार्थिनींना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा अनुराधा भोसले यांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्राची माहिती दिली.

### 'भिडे वाड्यात स्मारक करा'

महात्मा जोतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्या ऐतिहासिक वास्तूला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करावे अशी मागणी स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडिया, कोल्हापूर जिल्हा कमिटीने (एसएफआय) केली आहे. अमोल नाईक, नवनाथ मोरे, पंकज खोत आदींनी पत्रकाद्वारे मागणी केली आहे.

### समतावादी सांस्कृतिक चळवळीतर्फे कार्यक्रम

'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या त्यागामुळेच महिला व्यवस्थेच्या जाचक बंधनातून मुक्त झाल्या' असे मत प्रा. आसमा अत्तार यांनी व्यक्त केले. समतावादी सांस्कृतिक चळवळीतर्फे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती व सत्यशोधक अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी डॉ. भानुदास गाडवे होते. कृषी अधिकारी काव्यश्री घोलप, डॉ. धनश्री रोडे, डॉ. माधवी यमगर, प्रा. भाग्यश्री कांबळे, सुनीता आपटे, गीता जाधव, दिपाली काळे, प्रा. सुलोचना मोहिते, मनीषा कोळेकर, माजी उपसरपंच सरिता कवळे यांचा सत्कार झाला. गोखले कॉलेजच्या डॉ. स्मिता गिरी म्हणाल्या, 'सावित्रीबाई फुले यांच्या अंगी असलेले संस्कार, धैर्य, कष्ट, चिकाटी हे गुण हे सर्वच पिढ्यांना मार्गदर्शक आहेत.' समतावादी सांस्कृतिक चळवळीचे उपाध्यक्ष प्रा. प्रकाश नाईक यांनी मनोगत व्यक्त केले. सावित्रीबाई फुले यांच्याविषयीची माहिती सांगितली. प्रा. निलेश घोलप यांनी स्वागत केले. मनीषा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. ज्योती थोरात यांनी आभार मानले. राजेंद्र सणगर, राजेंद्र शिंगे, हणमंत कवळे आदीसह नागरिक उपस्थित होते.

## महिला प्राध्यापकांचा मेळावा




शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघातर्फे महिला प्राध्यापक मेळाव्यात बोलताना डॉ. माया पंडित. सोबत डॉ. सुभाष जाधव, डॉ. इला जोगी व प्रा. सुनीता अमृतसागर.

'आजच्या काळातील वाढते अत्याचार व प्रतिगामी शैक्षणिक धोरणाविरोधात संघर्ष करत अध्यापनाचे कार्य करत असताना महिला प्राध्यापकांसमोर सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा आहे' असे प्रतिपादन डॉ. माया पंडित यांनी केले. शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघातर्फे (सुटा)सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिला प्राध्यापकांच्या मेळाव्यात त्या बोलत होत्या. शुक्रवारी दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवनच्या मिनी सभागृहात झालेल्या या मेळाव्यात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी सुटाच्या खजानिस डॉ. इला जोगी होत्या. डॉ. सुभाष जाधव म्हणाले,"शिक्षणक्षेत्रातील कार्यरत महिलांचे प्रबोधन व संघटन करण्याची गरज आहे.' प्रा. सुनीता अमृतसागर यांनी स्वागत केले. प्रा. गौतमी कांबळे यांनी आभार मानले.

## इंदिरा गांधी विद्यानिकेतनमध्ये पथनाट्य

महाद्वार रोड येथील इंदिरा गांधी विद्यानिकेतनमध्ये सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका एम. आर. मोहिते-पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सहावीच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याचे सादरीकरण केले. प्रांजली जाधव, चिन्मय इंगवले, राजवर्धन कांबळे, क्रांती झांजगे, अथर्व मस्के, अथर्व गवळी, नीशा बसापुरे, प्रसाद भोसले, करुणा खरुशे, श्रेयस माळी, सागर देवणे या विद्यार्थ्यांनी पथनाट्यात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे संयोजन पी. एम. भाट यांनी केले. आर. टी. गोरे यांनी आभार मानले.

# परदेशी विद्यार्थ्यांसाठी एज्युकेशन डेस्टिनेशन

**वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाने ठसा उमटविलेल्या व संशोधनाचे निरनिराळे आयाम प्राप्त केलेल्या कोल्हापूरचा राज्यात किंबहुना देशात तसा नेहमीच दबदबा राहिला आहे . या एकूणच कोल्हापूरच्या शिक्षण क्षेत्राची शिवाजी विद्यापीठ ही जननी मानली जाते . शिक्षणाच्या क्षेत्रात संबंध देशभरात शिवाजी विद्यापीठाचे नाव अग्रेसर राहिले आहे . यामुळेच कोल्हापूरच्या या शिक्षण क्षेत्राची एकंदरीत प्रगती व संशोधनासाठी मिळणारे पाठबळ पाहून परदेशातील विद्यार्थ्यांना कोल्हापूरचे शिवाजी विद्यापीठ खुणावत आहे .**

▶▶ सचिन लोंढे
सीसीआर, शिवाजी विद्यापीठ



शिवाजी विद्यापीठाने देखील या विद्यार्थ्यांसाठी विशेष असे 'परदेशी विद्यार्थी धोरण' आखून त्याची अंमलबजावणी देखील सुरू केली आहे. याच धोरणाचा फायदा घेऊन आज शिवाजी विद्यापीठामध्ये इतके परदेशी विद्यार्थी संशोधन स्तरावरील व पदव्युत्तर स्तरावरील शिक्षण घेत आहेत. यात प्रामुख्याने अरब प्रदेशातील व आफ्रिका खंडातील देशांमधील विद्यार्थी या ठिकाणी शिक्षण घेत आहेत. पुणे, मुंबई नंतर कोल्हापूरकडे वाढलेला या परदेशी विद्यार्थ्यांचा ओढा हा कोल्हापूर इतर शहरांच्या तुलनेत शिक्षणात अग्रेसर असण्याची खात्री पटवून देत आहे.

आयएसओ मानांकनप्राप्त शिवाजी विद्यापीठाने आपल्या विद्यार्थ्यांसाठी नेहमीच निरनिराळे उपक्रम राबविले आहेत. यातून विद्यार्थ्यांच्या एकुणच शैक्षणिक जडणघडणीत आमूलाग्र बदल घडून येताना आपणास पाहायला मिळत आहे. आपल्या स्थानिक विद्यार्थ्यांसोबतच परदेशी विद्यार्थ्यांना देखील माफक दरात उच्च प्रतीचे शिक्षण मिळावे याकरिता शिवाजी विद्यापीठाने 'परदेशी विद्यार्थी धोरण' राबविण्याचा एक सकारात्मक असा निर्णय घेतला. यानुसारच आज विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये विविध अधिविभागांमध्ये सुमारे ५५ इतके परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यात पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. तसेच संशोधन स्तरावरील पीएचडी शिक्षणासाठी सुद्धा परदेशी विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाची निवड करत असल्याचे आशादायक चित्र दिसत आहे. शिक्षणामध्ये सातत्यपूर्ण राखलेला उच्च दर्जा व संशोधनासाठी उपलब्ध असणारी संसाधने या जोरावर शिवाजी विद्यापीठाने आपले नाव नेहमीच अग्रेसर कसे राहील याकडे प्रामुख्याने लक्ष दिले आहे. याचाच परिपाक म्हणून परदेशी विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी पुण्या-मुंबईनंतर कोल्हापुरास पसंती देत असल्याचे चित्र आजच्या घडीला दिसत आहे. शिवाजी विद्यापीठ या विद्यार्थ्यांच्या राहण्या-खाण्याच्या सोईपासून ते त्यांच्या सुरक्षततेकडे काटेकोरपणे लक्ष पुरवत असते. विद्यापीठाच्या आवारातच या परदेशी विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयींनीयुक्त सुसज्ज अशा आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृहाचीउभारणी केली आहे.

शिवाजी विद्यापीठासोबतच विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या अनेक महाविद्यालयामध्ये देखील सात परदेशी विद्यार्थी पदवीचे शिक्षण घेत आहेत. सदर महाविद्यालयांमध्ये मिळणारे चांगल्या दर्जाच्या अभ्यासक्रमाचे शिक्षण पाहता व एकुणच कोल्हापूरमध्ये राहण्याचा व खाण्याचा वैयक्तिक माफक खर्च लक्षात घेता अधिकाधिक परदेशी विद्यार्थी कोल्हापूरकडे आकर्षित होत आहेत.

## भारतीय संस्कृतीची ओळख

या परदेशी विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची ओळख व्हावी आणि स्थानिक विद्यार्थ्यांशी त्यांचा सुसंवाद घडावा यासाठी विद्यापीठ नेहमीच नवनवीन उपक्रम राबवत असते. यामध्ये 'परदेशी विद्यार्थ्यांसोबत दिवाळी' हा उपक्रम परिपूर्ण अशा भारतीय संस्कृतीची ओळख परदेशी विद्यार्थ्यांना करून देण्यात महत्त्वाचा ठरला. कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव , इतर अधिकारी, प्राध्यापक वर्ग व भारतीय विद्यार्थी व परदेशी विद्यार्थी यांनी एकत्रित येऊन साजरी केलेली दिवाळी स्मरणात राहील असे हे परदेशी विद्यार्थी आपले अनुभव कथन करताना सांगतात. प्रामुख्याने या देशातील विद्यार्थी सध्या विद्यापीठामध्ये इराक, इराण, बांगलादेश, केनिया, अफगाणिस्तान, गिनी बिसाऊ,मोझाम्बिक, मॉरिशस, झिम्बाबवे आदी देशातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.



यापूर्वी मी गुजरात विद्यापीठामध्ये काही काळ शिक्षण घेतले आहे. त्यामानाने शिवाजी विद्यापीठातील शिक्षण व याठिकाणच वातावरण नक्कीच वेगळे आणि मनास भावणारे आहे. मी सध्या याठिकाणी वाणिज्य शाखेत शिक्षण घेत आहे. याठिकाणचे अधिविभाग, शिक्षक इतर विद्यार्थी सहकारी यांच्याशी चांगला मेळ जमल्यामुळे घरच्यासारखेच वातावरण याठिकाणी अनुभवयास मिळत आहे. आमच्यासाठी परदेशी विद्यार्थी वसतिगृहाची विद्यापीठामार्फत सोय केली आहे . याठिकाणी अत्यंत उच्च दर्जाच्या सोईसुविधा आम्हास विद्यापीठ प्रशासनाकडून मिळत आहेत.

– रिदाह अल्सेडनार,
पदव्युत्तर अभ्यासक्रम विद्यार्थी,
इराण

# दिव्यांगांसाठी उद्या राष्ट्रीय कार्यशाळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, यांच्या संयुक्त विद्यमाने 'डेव्हलपमेंट ऑफ ॲक्सेसिबल लायब्ररी फॉर पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज' विषयावर दि. ८ रोजी विद्यापीठ, महाविद्यालयीन, सार्वजनिक ग्रंथपाल यांच्या साठी एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेचा मुख्य उददेश हा दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत प्राप्त पत्रानुसार शैक्षणिक संस्थेतील ग्रंथालयात एक पूर्ण स्वरूपी सुसज्य असे दालन तयार करण्याबाबतचे प्रशिक्षण तथा मार्गदर्शन तज्ज्ञ व्यक्तीकडून मिळणार आहे. त्याचबरोबर ग्रंथपालाच्या विविध समस्यांवर विचारमंथन देखील होणार आहे. या कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणून गोव्याचे डॉ. ताहा हाजिक असणार आहेत. तर अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे भूषवणार आहेत. या प्रसंगी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, पुणे विद्यापीठाचे धनंजय भोले, झैनाब चिनीकमवाला, डॉ. सारा डूव्हल, व डॉ. नमिता खोत यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सार्वजनिक तथा महाविद्यालयीन ग्रंथपालांनी कार्यशाळेसाठी विद्यापीठ वेबसाईटवर ऑनलाईन रजिस्ट्रेशन उपलब्ध करून दिल्याची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी दिली आहे.

# सामाजिक बांधिलकीतून बातमीदारी आवश्यक

## निखिल पंडितराव; पत्रकार दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये पत्रकार दिनानिमित्त सोमवारी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजनप्रसंगी जिल्हाधिकारी दौलत देसाई, ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. जय सामंत, प्रा. डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. सुमेधा साळोखे. दुसऱ्या छायाचित्रात कार्यशाळेत बोलताना 'सकाळ'चे निवासी संपादक निखिल पंडितराव.**

कोल्हापूर, ता. ६ : कोणत्याही आपत्तीच्या काळात बातमीदाराने कर्तव्य आणि सामाजिक बांधिलकीचा समन्वय साधून काम केले पाहिजे. त्यामुळे आपत्तीकाळातील वस्तुस्थिती समाजासमोर येतेच; पण आपद्ग्रस्तांना मदतीचा हातही देता येतो. महापुराच्या काळात याचा वस्तुपाठ 'सकाळ'ने दाखवला आहे, असे प्रतिपादन 'सकाळ'चे निवासी संपादक निखिल पंडितराव यांनी केले. पत्रकार दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात आयोजित 'आपत्ती व्यवस्थापन व माध्यमांची जबाबदारी' या विषयावर ते आज बोलत होते. पत्रकारिता व जनसंवाद विभाग, जिल्हा माहिती कार्यालय आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मानव्यशास्त्र सभागृहात ही कार्यशाळा झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी दौलत देसाई, ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. जय सामंत यांच्या उपस्थितीत झाले. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात आपत्ती व्यवस्थापन आणि प्रसारमाध्यमांची जबाबदारी या विषयावर परिसंवाद झाला. यावेळी सहयोगी प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांनी स्वागत करून पाहुण्यांचा परिचय करून दिला. पत्रकारिता आणि संवादशास्त्र विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे पुस्तक देऊन स्वागत केले.

निखिल पंडितराव म्हणाले, ''महापुराच्या काळात रस्ते बंद असतानाही 'सकाळ'ने वाचकांशी असणारी बांधिलकी जपत अंक प्रकाशित केला व तो सर्वत्र पोहचवला. ज्यावेळी शक्य नव्हते तेव्हा वेब आवृत्तीच्या माध्यमातून सोशल मीडियावरून अंक वाचकांच्या हाती गेला. महापुराचे भीषण वास्तव तर बातम्यांतून लोकांना कळालेच; पण सकाळ रिलीफ फंडाच्या माध्यमातून पूरग्रस्तांना उभे करण्याचे कामही केले. प्रशासनाची मदत शेतकरी, पूरबाधित लोकांपर्यंत पोहोचावी यासाठी बातमी, वृत्तमालिका यांच्या माध्यमातून 'सकाळ' अजूनही सक्रिय आहे.''

जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी प्रशांत सातपुते यांनी आपत्ती व्यवस्थापनात सोशल मीडिया कशाप्रकारे उपयोगी पडतो, यासंबंधी उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले. वृत्तवाहिनीचे जिल्हा प्रतिनिधी संदीप राजगोळकर यांनी महापुरातील त्यांचे अनुभव कथन केले. यावेळी प्रा. डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. सुमेधा साळोखे यांच्यासह विद्यार्थी आणि कर्मचारी उपस्थित होते.

### माध्यमांनी जनजागृती करावी

उद्घाटन सत्रात डॉ. जय सामंत म्हणाले, ''जागतिक तापमान वाढीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. माळीणसारखी भूस्खलनाची दुर्घटना असेल किंवा वाळवंटीकरण झपाट्याने वाढण्याची क्रिया असेल, याबाबत मानवाने विचार करायला हवा. देश स्वातंत्र्य झाला त्या वेळी ३५ कोटी लोकसंख्या होती. सध्या १३० कोटींच्या घरात आहे. शेतजमीन, पाणी यांचे व्यस्त प्रमाण झाले आहे. धारणक्षमतेच्या बाहेर आपण जात आहोत. अशा स्थितीत जनजागृती करण्याची जबाबदारी माध्यमांची आहे. जनसंपर्क, संदेशवहन, जनजागृती झाली तरच येणाऱ्या आपत्ती काळात तोंड देऊ शकू.''